# प्रवेशासंदर्भात नियम

१ विद्यापीठाच्या निकषांवर आधारीतच प्रवेश दिला जाईल.

२ विद्यापीठाच्या निकषांमध्ये वेळोवेळी होणारे बदल विद्यार्थ्यांस बंधनकारक असतील.

३ प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसांचे आत प्रवेश रद्द करावयाचा असल्यास एकूण वार्षिक फीच्या 10% रक्कम कपात करण्यात येईल.

४ प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसांचे पुढे पण ३० दिवसापूर्वी प्रवेश रद्द करावयाचा असल्यास एकूण वार्षिक फीच्या २५% रक्कम कपात करण्यात येईल.

५ ३० दिवसाच्या पूढे प्रवेश रद्द केल्यास सत्र १ ची पुर्ण फी भरावी लागेल.

६ वरील नियमात बदल करण्याचे सर्व अधिकार मा. प्राचार्य यांना राहतील.

# शिस्त पालनाचे नियम

१ संस्थेचे ठरवून दिलेल्या गणवेषातच उपस्थित राहणे विद्यार्थ्यांस बंधनकारक असेल.

२ कॉलेज परिसर, बस इत्यादि ठिकाणी संस्थेने ठरवून दिलेले ओळखपत्र परिधान करणे विद्यार्थ्यांस बंधनकारक असेल.

३ संस्थेच्या कोणत्याहि मालमत्तेचे नुकसान केल्यास त्या मालमत्तेची संपूर्ण भरपाई करण्यात येईल.

४ परवानगीशिवाय अनुपस्थित राहिल्यास दंडात्मक कार्यवाहि करण्यात येईल.

५ सतत उशीरा येणे हि अनुपस्थिती धरण्यात येईल

६ विद्यापीठ परिक्षेसाठी किमान ८०% उपस्थिती बंधनकारक आहे नसल्यास होणाऱ्या नुकसानीस स्वत: विद्यार्थी जबाबदार असेल.

७ कॉलेज मार्फत घेतल्या जाणाऱ्या चाचणी, प्रात्यक्षिक परिक्षेला बसणे विद्यार्थ्यांस बंधनकारक असेल. अंतर्गत मूल्यांकनासाठी त्याचा विचार करण्यात येईल.

८ विद्यार्थ्यांने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेशी गैरवर्तन केल्यास कायदेशीर कारवाई करण्यातयेईल.

९ सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार रॅगींग हा कायदेशीर गुन्हा असून तसे आढळल्यास कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१० प्रवेशित विद्यार्थ्याव्यतिरिक्त इतरांना कॉलेज परिसरात प्रवेशास सक्त मनाई आहे.

११ मोबाईल, आयपॉड इत्यादि तत्सम उपकरणांच्या वापराव बंदी असून आढळल्यास कडक कारवाई करण्यात येईल.

१२ कोणत्याही प्रकारचे व्यसन कॉलेज परिसरात निषिद्ध असून आढळल्यास कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१३ संस्थेमधील वेळोवेळी होणाऱ्या सामाजिक राष्ट्रीय सांस्कृतिक उपक्रमास उपस्थित राहणे विद्यार्थ्यांस बंधनकारक असेल

१४ वरील नियमात बदल करण्याचे सर्व अधिकार मा. प्राचार्य यांना राहतील.